# प्रकरण - 2 (<u>पुस्तिका</u> - 1)
## संस्थेची संरचना, कामे व कर्तव्याबाबतचा तपशील

2.1 <u>लोकप्राधिकरणाची उद्दिष्टे व हेतू :-</u>

नवीन जलस्त्रोताबाबतची कामे, नवीन जलवाहिन्या टाकणे, त्याकरिता बोगदे, भुयारे इ.ची बांधणी सेवाजलाशयासह अधिकाधीक पाणी आणून त्याच्या समान वितरणाकरिता टाकण्यात येणा-या जलवाहिन्या, नवीन उदंचन केंद्रे, जलप्रक्रिया केंद्रे, जलशुद्धिकरण प्रक्रिया केंद्रे इ.च्या बांधणी, पुनर्बांधणीच्या तसेच त्यासंबंधीत सर्व कामांसाठी आवश्यक असणारे यांत्रिकी व विद्युत घटकांबाबतचे नियोजन व बांधणी उभारणी करणे.

2.2 <u>विशेष कार्य / कल्पना (नियोजन)</u> :-

मुंबई शहराच्या विविध मोठ्या भागांना सर्वोच्च प्रतीच्या पिण्याच्या स्वच्छ पाणी पुरवठ्यात समान प्रमाणात वाटप होण्यासाठी वृद्धी करणे.

2.3 <u>इतिहास व माहितीचा संदर्भ :-</u>

मुंबई शहर व उपनगरांचा जसा विस्तार होऊ लागला तसा पाण्याचा अतिरिक्त पुरवठा करण्याकरिता हाती घ्यावयाच्या नवीन पाणी पुरवठा प्रकल्पांसाठी प्रमुख अभियंता (पूर्वीचे नांव प्रकल्प अभियंता) असा वेगळा विभागच स्थापन करण्याची गरज भासली. या प्रकल्पाच्या कामांमध्ये जलस्त्रोताच्या विकासापासून ते उच्चतम दर्जाचे पाणी शहर, पूर्व आणि पश्चिम उपनगरांमधील जलाशयापर्यंत आणण्याकरिता केंद्र सरकार व राज्य सरकारकडून घ्याव्या लागणा-या विविध मान्यता / मंजूरी, भूसंपादनापासून ते संपूर्ण व्यवस्थेची संकल्प चित्रे तयार करणे इ. गोष्टींचा अंतर्भाव होतो. सध्याच्या पाणी पुरवठा प्रकल्पांमध्ये ब-याचशा यांत्रिकी व विद्युत घटकांचा उदा. विद्युत उपकेंद्रे, उदंचन संयंत्रे, हरिणीकरण संयंत्रे, प्रक्रीया संयंत्रे विभागातील प्रकाशाची सोय, जलवाहिन्यांमधील झडपा, जोडणीची इतर कामे तसेच संलग्न सेवा जसे उद्वाहन, वातानुकुलन, संपर्क सुविधा इ.चा समावेश आहे.

उप प्रमुख अभियंता (पापुप्र) यां.व वि.(न.बा.वि.) यांचा विभाग खात्यातील कर्मचारी अधिकारी किंवा प्रकल्प सल्लागार यांच्या सहकार्याने वरील कामांचे नियोजन करून ती कामे प्रत्यक्ष पार पाडतात.

2.4 <u>कर्तव्ये</u> :-

नियोजन, संकल्पचित्रे, अंदाज, निविदेबाबतची कागदपत्रे, निविदा मागविणे, कागदपत्रांची छानननी, प्रत्यक्ष कार्यादेश देणे, खाते व बाहेरील संस्था उदा.विद्युतपुरवठा मंडळ, महामार्ग प्राधिकरण, एमटीएनएल, कारखाने निरीक्षक, विद्युत निरीक्षक इ.चा समन्वय साधणे, कंत्राट शर्तीनुसार सदर कामे नियत वेळेत पूर्ण करणे व कंत्राट शर्तीनुसार नमूद केलेल्या प्रतीचे काम पूर्ण करणे हे या विभागातील कर्मचा-यांचे मुख्य कर्तव्य आहे. तसेच कामाच्या प्रगतीबाबतची व पूर्ण झालेल्या कामांची कागदपत्रे जतन

करणे.

2.5 मुख्य कामे / कार्ये :-

प्रमाणभूत दर्जाचे पाणीपुरवठा संबंधित विविध प्रकल्प राबविणे.

2.6 पुरविण्यात येणा-या सेवांची यादी :-

**चालू व नियोजित कामे** –

उप प्रमुख अभियंता(पा.पु.प्र.) यां.व वि.(नगरबाहय विभाग)

1) 'हिंदूहदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मध्य वैतरणा जलाशय' येथील जलविद्युत उर्जा प्रकल्प व तरंगता सौर पीव्ही उर्जा प्रकल्प या नुतनीकरणक्षम संकरीत उर्जा प्रकल्पा अंतर्गत भूसंपादन अथवा पारेषण मार्गाधिकाराच्या रकमेची प्रतिपूर्ती आणि एस्क्रो खात्यामध्ये जमा करावयाच्या सुरक्षा रकमेचे आधिदान.

2) ब)'हिंदूहदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मध्य वैतरणा जलाशय'' येथील १०० मेगावॅट क्षमतेच्या अक्षय संकरित उर्जा प्रकल्पाच्या वित्तिय परिनिश्चिती कालावधी दरम्यान सहाय्य सेवा पुरविण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करणे.

3) येवई क्लोरिनेशन केंद्र ते पांजरापूर संकुल दरम्यान ओएफसी केबलच्या पुरवठयासह, एचटी व एलटी केबलचा पुरवठा, स्थापना, चाचणी व कार्यान्वित करणे.

4) पांजरापूर येथे पर्यायी क्लोरीन मोटिव्ह वॉटर लाईन कार्यान्वित करणे.

5) उप प्रमुख अभियंता (पा.पु.प्र.) यां व वि.(न.बा.वि.), बाळकुम यांच्या कार्यालयासाठी २० संगणकांची खरेदी करणे.

6) अस्तित्वात असलेल्या Twin Tansa mains च्या 1800 मि.मी. व्यासाच्या मुख्य जलवाहिन्याऐवजी 2400 मि.मी. व्यासाची एक जलवाहिनी भांडुप संकूल ऍंकर ब्लॉक ते मरोशी गेट पर्यन्त टाकणे. फेज 2 – भाग अ, भाग ब व भाग क.
**- यांत्रिकी व विद्युत कामे.**

**नविन कामे:**

1) भांडुप संकुल येथे २००० द.लि.लि. प्रतिदिन क्षमतेचा नवीन जलशुध्दीकरण प्रकल्प आरेखण, बांधकाम व प्रचालन या तत्वावर विकसित करण्यासाठी स्थापत्य, यांत्रिकी, विद्युत व उपकरणीकरणाचे काम

2.7 संरचनात्मक तक्ता :-

**उप-प्रमुख अभियंता (पा.पु.प्र.)यांत्रिकी आणि विद्युत (नगरबाहय विभाग)**

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता (पा.पु.प्र.) (यां.व वि.).-1 रिक्त पद | कार्यकारी अभियंता (पा.पु.प्र.) बां (यां.व वि.) |
| सहाय्यक अभियंता - 2 | सहाय्यक अभियंता - 3 |
| दुय्यम अभियंता – 4 | दुय्यम अभियंता - 1 + 2 रिक्त पद |
| कनिष्ठ अभियंता - 2 रिक्त पद | कनिष्ठ अभियंता - 1+1 रिक्त पद |
| मु. लिपिक - 1 | |
| लिपिक - 1 + 1 रिक्त पद | |
| वरीष्ठ लघुलेखक -1 रिक्त पद | |
| कनिष्ठ लघुलेखक –1 रिक्त पद | |
| टंकलेखक-1 रिक्त पद | |

2.8 जनतेकडून अपेक्षा :-

सदर कामे पार पाडताना होणा-या गैरसोयी सहन करुन सहकार्य करणे.

2.9 जनतेच्या सहभागाच्या योजना :-

याकरीता कोणतीही वेगळी योजना नसली तरीही नागरिकांना सदर प्रकल्प कामांना भेटी द्यावयाच्या असल्यास त्याकरीता त्यांच्या खर्चाने योग्य परवानगीसह भेटींचे आयोजन करता येईल (कामाच्या ठिकाणचे छायाचित्रण टाळून).

2.10 सेवा पुरविण्याची संरचना व जनतेच्या तक्रारी :-

हि बाब प्रकल्प कामांबाबत लागू होत नाही. तरीही नागरिकांच्या काही तक्रारी असल्यास निर्देशित अधिकारी त्याबाबत लक्षपूर्वक ऐकून त्यावर उत्तर देतील.

सही/-25.4.2024
उप प्रमुख अभियंता(पा.पु.प्र)
यां व वि.(नगरबाहय विभाग)